मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

जा.क्र.मनपा/आस्था/ ११४ /2026-27 दि. 23 / 07 /2026

प्रति,

सिस्टिम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952, बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 अंतर्गत तरतुदी अन्वये करावयाच्या कार्यवाहीबाबतचे दरपत्रक मागविणेबाबत ...

महानगरपालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952, बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 अंतर्गत तरतुदी अन्वये करावयाच्या कार्यवाहीबाबतचे दरपत्रक मागविणेबाबत मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. (अंदाजित खर्च रु.10,00,000/- अक्षरी रु.दहा लाख मात्र)

सबब वरील विषयाचे दरपत्रक जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(डॉ.सचिन सांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- दरपत्रक जाहीर सूचना छायांकित प्रत.

X:\आस्थापना विभाग\निविदा\वेदांत एंटरप्राईजेस\ऑल लेटर्स.docx

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 798 /2026-27 दि. 23 / 07 /2026

|| दरपत्रक जाहीर सूचना ||

महानगरपालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952, बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 अंतर्गत रेकॉर्ड तपासून प्रती महिना अहवाल सादर करणेकरीता सल्लागार यांचेकडून 11 महिन्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

दरपत्रकाचा नमुना महानगरपालिकेत रक्कम रु.100/- रोखीने भरल्यानंतर उपलब्ध होऊ शकेल.

सल्लागाराने सादर केलेल्या सिलबंद लिफाफ्यामधील दरपत्रक दि. 01 / 08 /2026 रोजी दु.03.00 वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, तिसरा मजला, आस्थापना विभाग येथे स्विकारण्यात येईल. शक्यतो त्याच दिवशी दु.4.00 वाजता दरपत्रकाचे सिलबंद लिफाफे उघडण्याची कार्यवाही उपायुक्त (मुख्यालय) यांच्या दालनात करण्यात येईल.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

Z:\आस्थापना विभाग\सगणक चालक\दरपत्रक - जहिर सुचना.docx

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि. ठाणे. 401 101.

दरपत्रकाविषयी नियम व अटीशर्ती सन 2026-27

कामाचे नाव :- महानगरपालिकेतील विविध विभागातील सल्लागारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952 The बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 कायद्यामधील तरतुदी अन्वये करावयाच्या कार्यवाहीबाबतचे दरपत्रक खालील नियम व अटीशर्तीनुसार मागविण्यात येत आहे.

1) कोणत्याही शाखेचा पदवी व वरील विषयासंबंधित डिप्लोमा / LLB (Bachelor of Law)
2) शासकीय / निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेमधील समतुल्य कामाचा अनुभव असणे आवश्यक.
3) फॉर्म फी (शासन निर्णयानुसार)
4) वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Certificate)
5) पॅन कार्डची प्रत
6) संस्था नोंदणी प्रमाणपत्र
7) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेमधील समतुल्य कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र
8) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काळ्या यादीत नसल्याबाबत दरपत्रक धारकाच्या लेटरहेडवर प्रतिज्ञापत्र
9) दरपत्रकासाठी देण्यात आलेले सर्व कागदपत्रे खरी / सत्य असल्याबाबत रु.500/- स्टॅम्प पेपरवर पतिज्ञापत्र

सर्वसाधारण अटिशर्ती :-

1) दरपत्रक ऑफलाईन पध्दतीने विहित मुदतीत स्विकारण्यात येतील, विहीत मुदतीतनंतर दरपत्रके प्राप्त झाल्यास त्याला महानगरपालिका जबाबदार असणार नाही.
2) करारनामा करणेपूर्वी कंत्राटदाराने रु.50,000/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) इतकी सुरक्षा अनामत रक्कम Nationalize/Sheduled बँकेची बँक गॅरेंटी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.
3) सल्लागाराने त्यांचे नाव, संपूर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक राहील.
4) महानगरपालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदयानुसार EPF व ESIC भरल्याबाबतची कागदपत्रे तपासण्याची जबाबदारी सल्लागार यांची असेल.

Scanned with OKEN Scanner

5) सदरचे काम हे महानगरपालिकेस करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यादेशामध्ये नमुद केलेल्या विभागात व दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन द्यावयाचे आहे.

6) कोणतीही दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रक नाकारण्याचे, तसेच कोणतेही कारण न देता दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

7) मंजूर सल्लागार यांचेकडून नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत, आयकर व अन्य कर व शासनाचे वेळोवेळी लावण्यात येणारे कर देयकातून कापून घेण्यात येतील.

8) सल्लागार यांचा नियमित आस्थापनेशी काहीही संबंध असणार नाही. तसेच महापालिका सेवेत सामावुन घेण्याचे हक्क कंत्राटदारास असणार नाही.

9) सर्वसाधारण कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाज करावे लागेल. आवश्यकता असल्यास सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी देखील सोपविलेले कामकाज करावे लागेल.

10) याकामी लेखापरीक्षणत काही आक्षेप आल्यास त्यांची योग्य पुर्तता करण्याची जबाबदारी सल्लागाराची राहील.

11) प्रचलित शासकीय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची/सल्लागाराची राहील.

12) महानगरपालिकेच्या आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल. महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल. महापालिकेच्या हिताविरुध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामाकाजात गोपनीयता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.

13) सदरचे दरपत्रक मिळण्याकरीता अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळल्यास निविदाधारक/यशस्वी कंत्राटदार/सल्लागार यांचे दरपत्रक रद्द करण्यात येईल व सदर कंत्राटदाराला यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

14) दरपत्रक मंजूर सल्लागार यांनी महानगरपालिकेबरोबर ठरवून दिलेल्या कामाचा करारनामा नियमानुसार स्टॅम्प पेपरवर त्वरित करुन द्यावा. तद्नंतर कार्यादेश देण्यात येईल. करारनाम्यातील अटी व शर्ती संबंधितावर बंधनकारक राहतील.

15) दरपत्रक सादर करताना दरपत्रकातील नियम व अटी मान्य असल्याबद्दल त्यावर शिक्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

16) सल्लागारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/वस्तु व सेवाकराची रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम अदा केली जाईल.

17) दरमहा अदा होणाऱ्या देयामधून नियमानुसार आयकर व वस्तू व सेवा कर व इतर शासनाने लागू केलेल्या करांची वजा करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

18) पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे/सल्लागाराचे एकुण दरावरुन न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील.

19) प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.

20) सल्लागारांकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम देय राहणार नाही जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त केली जाईल.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

Scanned with OKEN Scanner